**सं.फौ.ख.क्र. ४४५/२०२०**
**सरकार वि. विद्यानंद**
**निशाणी क्र.८**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — किशोर पुरणलाल यादव
वय — ६५ वर्ष धंदा — पानठेला
पत्ता — गवळीपुरा, कन्हान, जि. नागपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. दि.११/११/२०१९ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही पंचनाम्याची कार्यवाही केली नव्हती. आता मला समन्स दाखविला, त्यावर माझी सही आहे. पोलीसांनी माझी सही चहाच्या दुकानावर घेतली होती. सहीला **निशाणी ९** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी १०** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ११/११/२०१९ रोजी पोलीसांनी मला जे.एन. हॉस्पीटल, कांद्री ते बोरडा रोड कन्हान येथे पंचनाम्यासाठी बोलवीले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याप्रमाणे मी घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनमा तयार केला, मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री भिमटे यांच्यातर्फे.</u>**

**नाकारला**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

**स्वा/–**

ठिकाण –कामठी (रा.र. शेरेकर)

दिनांक –०७/०३/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.